# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.04.2025** **वारःशनिवार**

---

1. अद्वैत तत्वज्ञानामध्येच राष्ट्रांतर्गत संघर्ष आणि मानवी मूल्यांशी निगडीत आव्हानांवर उपाय, पंतप्रधानांचे प्रतिपादन
2. तमिळनाडूत एआयएडीएमके आणि रालोआ आघाडीची युती
3. दिल्लीत द्वैवार्षिक नौदल कमांडर्स परिषदेची पहिली आवृत्ती संपन्न
4. अमृत भारत स्टेशन्स योजनेमध्ये महाराष्ट्रातल्या 132 रेल्वे स्थानकांचा समावेश
5. नेमबाजी विश्वकरंडक स्पर्धेत भारत चार सुवर्णपदकं, 2 रौप्य आणि 2 कास्यपदकांसह दुसऱ्या स्थानावर आणि
6. दिल्लीत काल धुळीचं वादळ, तर उत्तर भारतात मुसळधार पावसाचा इशारा

**पंतप्रधान- मध्यप्रदेश दौरा**

जग भौतिक प्रगती करतानाच युद्ध, राष्ट्रांतर्गत संघर्ष आणि मानवी मूल्यांशी निगडीत विविध आव्हानांना तोंड देत आहोत, या आव्हांनावरील उपाय हे अद्वैत तत्वज्ञानातूनच मिळणार असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी काल केलं. मध्य प्रदेशातल्या अशोकनगर इथल्या इसागढ इथं श्री आनंदपूर धाम इथं भाविकांना ते संबोधित करत होते. यावेळी मोदींनी परमहंस अद्वैत पंथाच्या मंदिरांना भेट दिली तसंच प्रमुख आध्यात्मिक नेत्याची भेट घेतली. सत्संग कार्यक्रमातही सहभागी झाले होते. यावेळी बोलताना, गरीब आणि वंचितांची प्रगती, सबका साथ सबका विकास हा मंत्र आणि सेवेची भावना हेच केंद्रसरकारची मार्गदर्शक मूलमंत्र असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. समाजातील गरीब, वंचित घटकांचे जीवन सुलभ करण्यासाठी प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, आयुष्मान योजना, प्रधानमंत्री आवास योजना आणि जल जीवन मिशन सारख्या कल्याणकारी योजना राबवल्या जात असल्याचं ते म्हणाले. पर्यावरण संरक्षणाला चालना देण्यासाठी 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेचाही त्यांनी उल्लेख केला.

**पंतप्रधान-अण्णा द्रविड**

तामिळनाडूत अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम पक्षानं राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत आगामी विधानसभा निवडणुकीसाठी युतीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. मोदींनी त्यांच्या समाजमाध्यमांवरील संदेशात, रालोआ आघाडीच्या इतर भागीदारांसह तामिळनाडूच्या प्रगतीसाठी परिश्रम करतील आणि राज्याला प्रगतीच्या नव्या शिखरावर घेऊन जातील असं म्हटलं आहे.

**ओडिशा-आयुष्मान**

केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांच्या हस्ते काल ओडिशात आयुषमान भारत योजनेचा शुभारंभ झाला. गेल्या सहा वर्षात गरिबांच्या उपचारांवर सव्वा लाख कोटी रुपये खर्च केल्याचं सांगून नड्डा यांनी ओडिशा राज्य सरकारच्या गोपबंधू जन आरोग्य योजनेसमवेत आयुषमान भारत ही योजनाही राबवण्यात येणार असून यासाठी केंद्रासोबत एक सामंजस्य करार केला आहे. या एकत्रीकरणामुळे, राज्यातील आदिवासी नागरिकांसह साधारणपणे एक कोटी कुटुंबांमधील सुमारे साडेतीन कोटी लोकांना या एकत्रित योजनेअंतर्गत सामावून घेतले जाईल.

**नौदल कमांडर परिषद**

दिल्लीत काल द्वैवार्षिक नौदल कमांडर्स परिषद 2025 ची पहिली आवृत्ती काल पार पडली. सागरी क्षेत्रातील सुरक्षा आव्हानांवर आणि भारतीय नौदलाच्या परिचालन तयारीचा आढावा यांवर दोन टप्प्यात चर्चा झाली. कारवार इथं झालेल्या परिषदेच्या उद्घाटन सत्राचं अध्यक्षपद संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भूषवलं यामध्ये संरक्षण प्रमुख, संरक्षण सचिव, संरक्षण मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि नौदल कमांडर्स सहभागी झाले होते. त्यानंतर संरक्षणमंत्र्यांनी आयओएस सागर नौकेला हिरवा झेंडा दाखवला. त्याशिवाय सीबर्ड प्रकल्पाचा भाग असलेले जहाजे उभी करण्यासाठीचे नऊ अत्याधुनिक सागरी धक्के, आठ निवासी इमारती आणि अनेक महत्त्वाच्या उपयुक्त उपकरणांचे उद्घाटन देखील केले.

**रुबियो**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी दहशतवादाविरोधातील भारत आणि अमेरिका यांच्या परस्परसहकार्याचे कौतुक केलं आहे. 26-11 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख सुत्रधार तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाविषयी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशाला जयशंकर यांनी उत्तर दिले आहे. या हल्ल्यातल्या पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे मोठे पाऊल उचलले असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. अमेरिका देखील हल्ल्यात जीव गमावलेल्या सहा अमेरिकी नागरिकांसह 166 मृत नागरिकांसाठी न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचं रुबियो यांनी नमूद केलं आहे.

**एनटी राणा प्रत्यार्पण**

दरम्यान, राणाच्या प्रत्यार्पणानंतर तो नवी दिल्लीत दाखल होताच राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल संध्याकाळी त्याला औपचारिक अटक केली. वैद्यकीय तपासणीनंतर रात्री उशिरा राणाला पटियाला हाऊस न्यायालयात विशेष एनआयए न्यायाधीशांसमोर हजर करण्यात आले असून, त्याला पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

**आसियान**

भारताने आयोजित केलेल्या आसियान-भारत वस्तू व्यापार करारासंदर्भातल्या संयुक्त समितीची आठवी बैठक काल दिल्लीत पार पडली. पाच दिवसांच्या या बैठकीत, कराराचे आधुनिकीकरण करणे, तो अधिक प्रभावी, वापरकर्त्याला तसेच व्यापारासाठी अनुकुल करण्याच्या उद्देशाने चर्चा झाली. या बैठकीत ब्रुनेई, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओ पीडीआर, मलेशिया, म्यानमार, फिलीपिन्स, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनामसह आसियान देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

**रेल्वे-अश्विनी वैष्णव**

भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेमध्ये महाराष्ट्रातील एकंदर 132 रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातीलमहत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. मुंबईसाठी लवकरच 238 नव्या वातानुकूलित उपनगरीय रेल्वेगाड्या आणण्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराजांचा समृद्ध इतिहास, तसंच राज्यातल्या इतर सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळांचं दर्शन घडवणारी भारत गौरव रेल्वेगाडी येत्या 16 जुलैपासून सुरू होणार असल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली.

**वैष्णव**

येत्या मे महिन्यात होणारी वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट म्हणजेच वेव्हज् ही या क्षेत्रातली जगातली सर्वात मोठी परिषद असून, जगभरातल्या 100 पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार

असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या समवेत त्यांनी काल वेव्हज् उपक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला; त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**वेव्हज-संगीत स्पर्धा**

दरम्यान या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या संकल्पना संगीत म्हणजे थीम म्युझिक स्पर्धेच्या विजेत्यांची घोषणा माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने केली आहे. देशभरातून आलेल्या शेकडो प्रवेशिकांमधून सहा विजेत्यांची निवड करण्यात आली आहे.

**डीआरडीओ**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं सुखोई-30 एमकेआय विमानातून लांब पल्ल्याच्या ग्लाइड बॉम्ब गौरवची यशस्वी चाचणी घेतली आहे. या चाचणीत सुमारे 100 किलोमीटरचा पल्ला अचूकपणे पार केल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली. डीआरडीओ आणि भारतीय हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या चाचण्यांचा आढावा घेतला. गौरव हा एक हजार किलो ग्रॅम वजनाचा ग्लाइड बॉम्ब असून चांदीपूर इथल्या संशोधन केंद्र इमारत ,शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास केंद्र आणि एकीकृत चाचणी रेंज यांनी स्वदेशी बनावटीत तयार आणि विकसित केला आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल कोलकाता नाईट रायडर्स संघानं चेन्नई सुपर किंग्जचा 8 गडी राखून पराभव केला. चेन्नई सुपर किंग्ज संघाचं 103 धावांचं उद्दिष्ट कोलकाता नाईट रायडर्स संघानं 11 षटकात पूर्ण केलं. आज होणाऱ्या पहिल्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात तर दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्ज आणि हैदराबाद सनरायजर्स यांच्यात लढत होणार आहे.

**आयएसएसएफ विश्वकरंडक**

अर्जेंटिना इथं सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा फेडरेशन आयोजित विश्वकरंडक स्पर्धेत भारतानं चार सुवर्णपदकं, 2 रौप्य आणि 2 कास्यपदकांसह आठ पदकं जिंकून चीननंतर दुसरं स्थान मिळवलं आहे. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी, सौरभ चौधरी आणि सुरुची सिंग या भारतीय जोडीने कांस्यपदक जिंकले, तर सिफ्ट कौर समरा, रुद्रांक्ष पाटील, सुरुची सिंग, विजयवीर सिद्धू, ईशा सिंग, चैन सिंग आणि आर्या बोरसे आणि रुद्रांक्ष पाटील या खेळाडूंनीही चमकदार कामगिरी करत पदकांना गवसणी घातली.

**दिल्ली-धुळीचे वादळ**

राजधानी दिल्लीत काल संध्याकाळी हवामानात बदल होऊन धुळीचं वादळ आलं. त्याबरोबरच हलक्या पावसानं हजेरी लावल्यानं तापमानात घट झाली. धूळ आणि वादळी वाऱ्यामुळे दिल्ली विमानतळावर एकंदर 15 विमानांचे मार्ग बदलण्यात आले असून अनेक विमानांना विलंब झाला आहे.

**हवामान**

दरम्यान, भारतीय हवामान विभागानं जम्मू-काश्मीर, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, राजस्थान, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणमध्ये मुसळधार पावसाचा केशरी बावटा जारी केला आहे. याठिकाणी पुढील चार दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पंजाब, हरयाणा, चंदीगड, दिल्ली आणि राजस्थानमध्ये ताशी 50 ते 60 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**